# हेरिटेज मार्गावर मेट्रोची वेगवान 'धाव'

## सीएसटी मेट्रो स्थानक ८३ टक्के पूर्ण



म. टा. खास प्रतिनिधी

**मुंबई :** दक्षिण मुंबईचा परिसर अनेक जुन्या, हेरिटेज इमारतींनी नटलेला आहे. अशाच इमारतींचा पाया सांभाळत त्या इमारतींच्या खाली सीएसटी मेट्रो स्थानकाची उभारणी ८३ टक्के पूर्ण झाली आहे. हे स्थानक कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो -३ भूमिगत प्रकल्पाचा भाग आहे.

मुंबईला पश्चिमेकडून उत्तर-दक्षिण जोडण्यासाठी 'मेट्रो-३'ची उभारणी होत आहे. पूर्णपणे भूमिगत असलेल्या या मार्गिकेवर एकूण २७ स्थानके असतील. त्यापैकी २६ स्थानकांचे नियोजन पूर्ण होऊन त्यांची उभारणी जोमाने सुरू आहे. मार्गिकेचा पहिला टप्पा कुलाबा ते बीकेसी उत्तर तर दुसरा टप्पा बीकेसी दक्षिण ते कुलाबा (कफ परेड) असा असेल. यापैकी दुसऱ्या टप्प्यात सीएसटी मेट्रो स्थानकाचा समावेश आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात असले, तरी ही उभारणी आव्हानात्मक होती.

या मेट्रो प्रकल्पाची उभारणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसी) ही विशेष कंपनी करीत आहे. या कंपनीच्या म्हणण्यानुसार, सीएसटी स्थानक परिसरात एकूण १६९ विविध प्रकारची बांधकामे आहेत. त्यात २८ उंच इमारती आहेत. त्यापैकी १४ इमारती हेरिटेज आहेत. तसे असताना एकाही इमारतीला धक्का न लावता भूमिगत स्थानक विशेष टीबीएम यंत्राद्वारे खोदून तयार करण्यात आले. या स्थानकापर्यंत मार्गिका आणण्यासाठी मुंबई सेंट्रल स्थानकापासून ४.०७ किमी तर या स्थानकापासून मुंबई सेंट्रल स्थानकापर्यंत ३.८१ किमीचा बोगदा खणण्यात आला. या दोन्हीसाठी मिळून ४,४६६ सिमेंटच्या रिंग बसवाव्या लागल्या.

- बांधकामांना कुठलाही धक्का न लावता उभारणी
- दोन बोगदे खणले, ४,४६६ सिमेंटच्या रिंगांचा वापर



सीएसटी मेट्रो स्थानक खरे तर आझाद मैदान येथे असेल. आझाद मैदानातून हे स्थानक सध्याच्या भूमिगत पादचारी मार्गाशी जोडले जाणार आहे. त्यामुळे एकाचवेळी मेट्रो रेल्वे, सध्याचे उपनगरीय व मेल/एक्स्प्रेस स्थानक, महापालिका आणि 'टाइम्स ऑफ इंडिया' इमारतीशी हे मेट्रो स्थानक जमिनीखालून जोडले जाणार आहे.